# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

## अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक 10]

वेळ : सकाळी 11.30 वा.

दिनांक : 08/01/2019

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जानेवारी 2019 ची मासिक सभा **मंगळवार** दिनांक 08/01/2019 रोजी सकाळी 11.30 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सभापती |
| 2. | मा.केशव हनुमंत घोळवे | सदस्य |
| 3. | मा.तुषार रघुनाथ हिंगे | सदस्य |
| 4. | मा.यादव मिनल विशाल | सदस्या |
| 5. | मा.वैशाली जालिंदर काळभोर | सदस्या |
| 6. | मा.प्रमोद कुटे | सदस्य |
| 7. | मा.शैलजा अविनाश मोरे | सदस्या |
| 8. | मा. बाबर शर्मिला राजेंद्र | सदस्या |
| 9. | मा. सावंत राजेश पोपट | स्वीकृत सदस्य |
| 10. | मा. कदम सुनिल मानसिंग | स्वीकृत सदस्य |
| 11. | मा.कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्रीमती आशादेवी दुरगुडे, क्षेत्रिय अधिकारी, मा. श्री दिपक सुपेकर-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.श्री प्रवीण लडकत-कार्यकारी अभियंता(पाणीपुरवठा), मा.श्री आर.के.लटपटे –प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), मा.श्री. महादेव शिंदे –सहा. आरोग्याधिकारी, मा.श्री प्रदिप बंडागळे- प्र.लेखाधिकारी, मा.श्री मुठाळ चंद्रकांत-उपअभियंता मा.श्री मोहन खोंद्रे -उपअभियंता (झोनिपु स्थापत्य् ), मा.श्री डी.एम.कुंभार-उपअभियंता (पाणीपुरवठा),मा.श्री एस.जे.हरिदास-उपअभियंता (झोनिपु),मा. श्री. एस.पी. काळे-उपअभियंता(ड्रेनेज), श्री अरुण सोनकुसरे-कार्यालय अधिक्षक (अतिक्रमण), श्री गोसावी जी.आर.-सहा.उद्यान अधिक्षक, श्री डी.जी.कांबळे- उदयान सहाय्यक, श्री दिपक कोटियाना-आरोग्य् निरिक्षक(पशुवैद्यकिय विभाग), श्री पगार एस.जी.-जनरेटर ऑपरेटर, श्री जगदाळे संतोष मोहन-सर्व्हेअर नगररचना, श्री कांबळे आर.बी.-लिपिक इ.अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, अनुराधा गणपत गोरखे यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

तद्नंतर **माहे नोव्हेंबर २०१८ (कार्यपत्रिका क्र.०८) व माहे डिसेंबर २०१८ (कार्यपत्रिका क्र.०९)** दिनांक ११/१२/२०१८ रोजी झालेल्या अ प्रभाग समिती सभेचे सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक१:-** सन्मा.अध्यक्षा अनुराधा गोरखे ,सन्मा.सदस्य् केशव घोळवे, सन्मा.सदस्य् प्रमोद कुटे, , सन्मा.सदस्य् तुषार हिंगे, सन्मा.सदस्या वैशाली काळभोर,सन्मा.सदस्या मिनल यादव यांचा दिनांक ०८/०१/२०१९ रोजीचा प्रस्ताव. प्रभाग स्थापनेपासून झालेल्या ठरावांची माहिती मिळणेबाबत.

**विषय क्रमांक२:-** सन्मा.अध्यक्षा अनुराधा गोरखे यांचा दिनांक ०८/०१/२०१९ रोजीचा प्रस्ताव. अ प्रभाग समिती सदस्यांचे राजस्थान दौ-यास मान्यता मिळणेबाबत.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेण्यात आले.

---

(कृ.मा.प.)

विषय क्रमांक 1

विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

अनुमोदक : मा.केशव घोळवे

ठराव क्रमांक 59

दिनांक- 08/01/2019

सुचक: मा. प्रमोद कुटे

संदर्भ: सन्मा. सन्मा.सदस्य् प्रमोद कुटे, सन्मा. सदस्य् केशव घोळवे, सन्मा.सदस्य् तुषार हिंगे, सन्मा.सदस्या वैशाली जालिंदर काळभोर, सन्मा.सदस्या मिनल विशाल यादव यांचा दिनांक ०८/०१/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

अ प्रभाग समिती माहे ऑगष्ट् २०१७ ला स्थापन झाली त्या वेळेपासून आजपर्यंत झालेल्या सर्व ठरावांची माहिती पुढील मासिक सभेपर्यंत देणेत यावी. यामध्ये प्रत्येक ठराव व त्यानुसार केलेली कार्यवाही व प्रलंबित असल्यास कारणासह माहिती असावी या विषयाबाबत चर्चा होऊन सदरचे प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

विषय क्रमांक 2

विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

ठराव क्रमांक 60

दिनांक- 08/01/2019

सुचक: मा. अनुराधा गोरखे

संदर्भ: अ क्षेत्रिय कार्यालयातील सन्मा.सदस्य् यांचा दिनांक ०८/०१/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

सध्या स्वच्छ भारत सर्व्हेक्षण २०१९ चालू आहे. त्या निमित्ताने अ प्रभाग समिती सदस्यांना स्वच्छता भारत अभियान अंतर्गत जयपूर, उदयपूर(राजस्थान) महानगरपालिकेने राबविलेल्या विविध योजना व प्रकल्पांची पाहणी व अभ्यास करुन त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये त्यातील चांगल्या योजना व प्रकल्पांची अंमलबजावणी करणेचे दृष्टीने अ क्षेत्रिय् समिती सदस्य् व् महानगरपालिकेचे अधिकारी यांचेकरिता जयपूर उदयपूर(राजस्थान) महानगरपालिका येथे पाहणी करणेकामीचे दौ-यास व होण-या खर्चास प्रभाग समितीची मान्यता देणेत येत आहे तसेच त्यासाठी येणा-या खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेकामी विषय कायम होणेची वाट न पाहता सदरचा विषय मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती- अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ अनुराधा गणपत गोरखे ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:- अक्षेका/9/कावि/ 06/2019 दिनांक:- 21/01/2019

(रामकिसन लटपटे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित ------------------------